सन २०१८-१९ या आर्थिक वर्षासाठी समग्र शिक्षा अभियान अंतर्गत व्यवसाय शिक्षण या कार्यक्रमासाठी निधी (अनुसूचित जाती उपयोजना) वितरीत करणेबाबत. (केंद्र व राज्य हिस्सा).

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः समग्र-२०१८/(१११/१८) भाग-३/एस.डी-६
मादाम कामा मार्ग हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक: ३० मार्च, २०१९

वाचा -

१) वित्त विभागाचे परिपत्रक क्र. अर्थसं/२०१८-प्र.क्र.६९/अर्थ-३, दि. ०२/०४/२०१८.
२) मानव संसाधन विकास मंत्रालय यांचे पत्र क्र.एफ.नं.७-२/२०१८-IS-१२ (SC)दि.१८.३.२०१९.
३) राज्य प्रकल्प समन्वयक, समग्र शिक्षा, मुंबई यांचे पत्र क्र.रामाशिअ/लेखा/केंद्र व राज्य हिस्सा/(३५/१८)/२०१८-१९/४२९, दिनांक २७.३.२०१९.

प्रस्तावना-

समग्र शिक्षा अभियान योजनेंतर्गत पूर्वाश्रमीच्या राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियानाच्या सुरु असलेल्या कार्यक्रमाकरिता व्यवसाय शिक्षण या उपक्रमासाठी केंद्र व राज्य शासनाच्या हिस्स्याचे प्रमाण (केंद्र : राज्य) ६०: ४० असे आहे. केंद्र शासनाने दिनांक १८.३.२०१९ रोजीच्या आदेशान्वये अनुसूचित जाती उपयोजनेचा रु.४८८.३७ लक्ष (रुपये चार कोटी अठ्ठ्याऐंशी लक्ष सदतीस हजार फक्त) इतका निधी राज्याच्या एकत्रित निधीत जमा केलेला आहे. समग्र शिक्षा अभियान अंतर्गत पूर्वाश्रमीच्या राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियानाच्या सुरु असलेल्या व्यवसाय शिक्षण या उपक्रमासाठी केंद्र शासनाने संदर्भ क्र.२ येथील पत्रान्वये राज्याच्या एकत्रित निधीत जमा केलेला निधी व सदर निधीच्या प्रमाणात राज्य हिश्श्याचा निधी मंजूर करण्याचा प्रस्ताव राज्य प्रकल्प समन्वयक, समग्र शिक्षा, मुंबई यांनी संदर्भ क्र.३ येथील पत्रान्वये शासनास सादर केला आहे. सदर निधी राज्याच्या एकत्रित निधीत जमा झाल्याचे वित्त विभागाच्या अर्थोपाय शाखेने अनौपचारिक संदर्भ क्र.१५१/अर्थोपाय, दि.२६.३.२०१९ अन्वये अभिप्राय दिले आहेत. सदर निधीच्या प्रमाणात राज्य हिस्सा (अनुसूचित जाती उपयोजनेचा) रु.३२५.५८ लक्ष (रुपये तीन कोटी पंचवीस लक्ष अठ्ठावन्न हजार फक्त) इतका येतो. केंद्र शासनाकडून प्राप्त झालेला केंद्र हिश्श्याचा निधी रु.४८८.३७ लक्ष (रुपये चार कोटी अठ्ठ्याऐंशी लक्ष सदतीस हजार फक्त) इतका निधी व त्याप्रमाणात राज्य हिस्सा रु.३२५.५८ लक्ष (रुपये तीन कोटी पंचवीस लक्ष अठ्ठावन्न हजार फक्त) असा एकूण रु.८१३.९५ लक्ष (रुपये आठ कोटी तेरा लक्ष पंच्च्याण्णव हजार फक्त) इतका निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबतचा शासन निर्णय खालीलप्रमाणे आहे.

शासन निर्णय-

केंद्र शासनाने दिनांक १८.३.२०१९ रोजीच्या आदेशान्वये समग्र शिक्षा अभियान अंतर्गत पूर्वाश्रमीच्या राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियानाच्या सुरु असलेल्या उपक्रमासाठी निधी रु.४८८.३७ लक्ष (रुपये चार कोटी अठ्ठ्याऐंशी लक्ष सदतीस हजार फक्त) इतका निधी मंजूर केला आहे व त्याप्रमाणात राज्य हिस्सा रु.३२५.५८ लक्ष (रुपये तीन कोटी पंचवीस लक्ष अठ्ठावन्न हजार फक्त) असा एकूण रु.८१३.९५ लक्ष (रुपये आठ कोटी तेरा लक्ष पंच्च्याण्णव हजार फक्त) इतका निधी मंजूर केला आहे. सदर निधी राज्य प्रकल्प संचालक, समग्र शिक्षा, मुंबई यांना खालील विवरणपत्रात दर्शविल्याप्रमाणे वितरित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

उपक्रमाचे नाव	लेखाशीर्ष	अर्थसंकल्पित तरतूद (रु.)	वितरित करण्यास मान्यता दिलेली तरतूद
१	२	३	४
व्यवसाय शिक्षण (Vocational Education)	मागणी क्रमांक ई-२, २२०२, सर्वसाधारण शिक्षण, ७८९ अनुसूचित जाती उपयोजना, (०१) अनुसूचित जाती उपयोजना, (०१) (०५) उच्च माध्यमिक शाळांमध्ये व्यावसायिक शिक्षण (अनुसूचित जाती उपयोजना) (केंद्र हिस्सा) (२२०२ आय ३१६), ३१, सहाय्यक अनुदाने (वेतनेतर)	रु.१४९५.१७ लक्ष	रू.४८८.३७ लक्ष
	मागणी क्रमांक ई-२, २२०२, सर्वसाधारण शिक्षण, ७८९ अनुसूचित जाती उपयोजना, (०१) अनुसूचित जाती उपयोजना, (०१) (०६) उच्च माध्यमिक शाळांमध्ये व्यावसायिक शिक्षण (अनुसूचित जाती उपयोजना) (राज्य हिस्सा) (२२०२ आय ३०७), ३१, सहाय्यक अनुदाने (वेतनेतर)	रु.९९६.७८ लक्ष	रू.३२५.५८ लक्ष
	एकूण	**रू.२४९१.९५**	**रू.८१३.९५ लक्ष**

२. वरील विवरणपत्रातील रकाना क्र. ४ येथील वितरीत करण्यास मान्यता दिलेल्या निधीचा खर्च रकाना क्र.२ येथील लेखाशिर्षांतर्गत सन २०१८-१९ या वर्षाच्या उपलब्ध तरतूदीतून भागविण्यात यावा.

३. वित्त विभागाच्या दि.०२/०४/२०१८ रोजीच्या परिपत्रकात नमूद केलेल्या सर्व बाबींची पूर्तता होत आहे.

४. सदर शासन निर्णयान्वये वितरित केलेला निधी केंद्र शासनाचे दि.१८.३.२०१९ रोजीच्या आदेशामध्ये दिलेल्या निदेशानुसार वरील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे व्यवसाय शिक्षण या उपक्रमात भांडवली मत्ता निर्माण करणाऱ्या अनावर्ती बाबीसाठी खर्च करावा.

५. सदर खर्च वित्त विभागाच्या संदर्भाधिन दि.०२/०४/२०१८ च्या शासन परिपत्रकातील सूचनांनुसार करण्यात यावा. सदर निधी आहरीत करुन वितरीत करण्यासाठी अवर सचिव / कक्ष अधिकारी (रोख शाखा), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, यांना "आहरण व संवितरण अधिकारी" तर सह सचिव (प्रशासन), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय यांना "नियंत्रक अधिकारी" म्हणून घोषित करण्यात येत आहे.

६. सदर योजनेअंतर्गत वितरीत तरतूद ही अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील लाभार्थ्यांसाठीच खर्च करण्यात येत आहे, याची दक्षता घेण्यात यावी.

७. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या संदर्भाधिन दि.०२/०४/२०१८ च्या शासन परिपत्रकान्वये, वित्त विभागाच्या अर्थोपाय शाखेने अनौपचारिक संदर्भ क्र.१५१/अर्थोपाय, दि.२६.३.२०१९ अन्वये दिलेल्या मान्यतेस अनुसरुन व सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अर्थसंकल्प (विघयो) शाखेने अनौपचारिक संदर्भ क्र.६७/विघयो,दि.२९.३.२०१९ अन्वये दिलेल्या मान्यतेस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०३३०२००८४२८२२१ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Santosh Umeshrao Gaikwad

Digitally signed by Santosh Umeshrao Gaikwad
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=1d60828c41033ab1da6d64ef17879745d578b334c05c1e8151ef933f134060bc, serialNumber=bc8833f9e213a7e4dfb9d2b071c9202ea52a04054e53b0c1bbf9e50c90a2cf5c, cn=Santosh Umeshrao Gaikwad
Date: 2019.03.30 20:13:13 +05'30'

(संतोष गायकवाड)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति-

१) मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई
२) मा.मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
३) मा.विरोधी पक्ष नेता, (विधानसभा/विधानपरिषद), विधानभवन, मुंबई
४) सर्व विधानसभा सदस्य/विधानपरिषद सदस्य, विधानभवन, मुंबई
५) मा.अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) मा.आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
७) राज्य प्रकल्प संचालक, समग्र शिक्षा अभियान, मुंबई.
८) शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक), पुणे.
९) संचालक, व्यवसाय शिक्षण, मुंबई
१०) अध्यक्ष, व्यवसाय शिक्षण मंडळ, मुंबई
११) सहसचिव (प्रशासन), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२) महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र -१ व २ मुंबई / नागपूर.
१३) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र - १ व २ मुंबई/ नागपूर.
१४) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई / बांद्रे.
१५) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१६) विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व)
१७) शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद (सर्व)
१८) वित्त विभाग, (व्यय-५)/अर्थसंकल्प शाखा/अर्थोपाय), मंत्रालय, मुंबई.
१९) नियोजन विभाग (कार्यासन १४७१), मंत्रालय, मुंबई
२०) कार्यासन अधिकारी (अर्थसंकल्प/रोखशाखा), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
२१) निवड नस्ती, एस.डी. ६